२३|३

**रे.क.नं. ६७/ २०२२**

**मे. सिव्हिल जज्ज ज्युनिअर डिव्हिजन पन्हाळा,**

**यांचे कोर्टात........**

| | | |
|---|---|---|
| १) महादेव बाळू पाटील | } | वादी |
| **विरुद्ध** | | |
| १) जयंती मनोहर पाटील वगैरे २ | } | प्रतिवादी |

**अर्जः-** प्रतिवादी नं. १ यांचे विरुद्ध दि. १७/०६/२०२५ इसवी रोजी झालेला "NO Cross" आदेश रद्द होऊन उलटतपास घेणेची परवानगी मिळणेसाठी

**यातील प्रतिवादी नं. १ तर्फे विनंती की,**

१) वादी यांनी प्रस्तुतचा दावा वि.प. यांचे विरुद्ध मे. पन्हाळा दुय्यम निबंधक यांचेकडील अ.नं. ८८३, रजि. दि. २७/०३/२०१८ इसवीचे बक्षीसपत्र रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२) सदर कामाची नोटीस प्रस्तुत प्रतिवादी यांना लागू झाली असून प्रतिवादी यांनी या कामी आपली सविस्तर कैफियत दाखल केली आहे व वादींचे दाव्यातील कथने स्पष्टतेने नाकारली आहेत. वादी यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र

24.2.26
Assistant Superintendent

## ORDER

1) This application is filed by defendant no.1 for setting aside the exparte proceeding against him on 17/06/2025. She stated that after demise of her husband she did not appear in courts and meet to her Advocate and she did not provide necessary documents and information to her Advocate. She did not come any information delay to proceedings. She residing with her father at Kudoli hence it is not possible for her to present in court hence she did not meet to her advocate. Her civil rights are involved hence it is necessary to give one reasonable opportunity to defendant no.1 for taking cross examination of plaintiff. Hence she prayed for allowing this application.

2) Plaintiff has filed his say and take strong objection to this application. Plaintiff stated that plaintiff's chief examination affidavit is filed. Thereafter defendant failed to take cross examination of plaintiff hence plaintiff closed his evidence. Thereafter exparte order is passed against defendant and matter is kept for filing evidence of defendant. Defendant has no right to cross examine plaintiff. Defendant no.1 filed this application is rejected. It is for any reasons. Thereafter this application is filed by defendant no.1 to file this application hence application is allowed with cost then impose cost of Rs. 500/- on defendant no.1 to file this application hence application is allowed. Heard both parties. It transpires that

3) Perused the record and say. This suit is filed by plaintiff for cancellation of gift deed and permanent injunction. It is necessary to give one reasonable opportunity to defendant no.1 as per natural justice principle. It is necessary to give one reasonable opportunity to defendant no.1 for ~~setting aside the~~ taking cross examination of plaintiff & it helps for proper adjudication of suit. Hence considering all above I proceed to pass following order.

## ORDER

Application is allowed with cost of Rs. 500/- (five hundred only) & cost given to plaintiff by defendant no.1.

Date – 05/05/25

(signature)
05/05/25
CJJD Panhala

दाखल केल्यानंतर मुदतीत प्रतिवादी यांना त्यांचा उलटतपास घेता आला नसल्याने प्रतिवादी यांचे विरुद्ध मे. कोर्टांनी दि. १७/०६/२०२५ इसवी रोजी निशाण २२ वर "No Cross" चा आदेश पारीत केला आहे. सदर आदेश रद्द होऊन प्रतिवादी यांना वादींचा उलटतपास घेणेची संधी देणेत यावी यासाठी प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तो मंजूर होणेसाठी योग्य व संयुक्तिक कारणे खालीलप्रमाणे:-

**अ)** प्रतिवादी यांना कोर्ट कामकाजाचा अनुभव नाही. तसेच, त्यांचे पतींचे निधन झालेवर त्या स्वतःचा चरितार्थ त्यांचे वडिलांचे मदतीने कसाबसा चालवत आहेत. यामुळे प्रतिवादी या प्रस्तुत कामा संदर्भाने वकिलांना मुदतीत भेटून उलटतपास घेणेसाठी आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे देऊ शकल्या नाहीत. त्यामुळे या कामी प्रस्तुत प्रतिवादी तर्फे वादींचा उलटतपास मुदतीत घेणे शक्य झाले नाही.

**ब)** प्रतिवादी यांनी वादींचा उलटतपास घेणेस जाणून-बुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी यांना उलटतपास घेऊन हे काम पुढे चालवणेचे आहे.

**क)** प्रतिवादी या विधवा स्त्री आहेत. त्यांचेकडे पन्हाळा येथे कोर्ट मध्ये जाणे-येणेसाठी व कोल्हापूर येथे जाऊन वकिलांची भेट घेण्यासाठी वाहनाची सुविधा देखील उपलब्ध नाही. त्यामुळे वकिलांची वेळेत भेट घेऊ शकत नाहीत व प्रत्येक तारखेस कोर्टात हजर राहू शकत नाहीत.

**ड)** प्रतिवादी या सध्या कोडोली, ता. पन्हाळा येथे त्यांचे वडिलांचे घरी आश्रय घेऊन राहात आहेत. त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे त्यांना पन्हाळा कोर्ट येथे येऊन काम चालवणे अशक्य झाले आहे.

24.2.26
Assistant Superintendent

**इ)** प्रस्तुतचा दावेचे कामी प्रतिवादी यांचे स्थावर मिळकतीतील हक्कसंबंध गुंतलेले आहेत. अर्ज नामंजूर झालेस प्रतिवादी यांचे दावा मिळकती मधील कायदेशीर हक्कसंबंध डावलले जाणार आहेत.

**ई)** खटल्यांची वारंवारीता टाळणेसाठी प्रस्तुत अर्ज मंजूर होणे योग्य व न्यायाचे असे आहे.

**उ)** प्रस्तुत अर्ज मंजूर होण्याने वादींचे काडीमात्रही नुकसान संभवत नाही. उलटपक्षी, अर्ज नामंजूर झालेस प्रतिवादी यांना त्यांचे हक्कांपासून व कायदेशीर दादीं पासून मुकावे लागणार आहे व त्यांचे पैशाच्या स्वरूपात कशानेही भरून न येणारे असे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर होणे योग्य व कायदेशीर असेच आहे.

**ई)** अर्ज मंजूर झालेस या कामाचा गुणदोषावर व अंतिम निवडा होणेस मदतच होणार आहे.

३) तरी, या कामी प्रतिवादी यांचे विरुद्ध निशाण २२ वर दि. १७/०६/२०२५ इसवी रोजी झालेला “No Cross” चा आदेश रद्द व्हावा आणि प्रतिवादी यांना वादींचा उलटतपास घेणेची संधी मिळावी ही नम्र विनंती आहे.

पन्हाळा

ता. २४/०२/२०२६.

मे.जा.व्हावे.

Jmpatil

24.2.26

Assistant Superintendent

**<u>प्रतिज्ञा</u>**

मी, प्रतिवादी नं. १ - जयंती मनोहर पाटील, व.व. २७,धंदा-शेती, रा. मु.पो. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर वरील अर्जामधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. ता. २४/०२/२०२६

**<u>ॲफिडेव्हिट</u>**

मी, प्रतिवादी नं. १, जयंती मनोहर पाटील, व.व. २७,धंदा-शेती, रा. मु.पो. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर, आज मु. पन्हाळा शपथपूर्वक कथन करते की, वरील अर्जामधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट. ता. २४/०२/२०२६

ॲफि. करणार यांना मी ओळखतो

ॲड. जी.जी. नानिवडेकर

**<u>प्रतिज्ञा</u>**

मी, प्रतिवादी नं. १, जयंती मनोहर पाटील, व.व. २७, धंदा- शेती, रा. मु.पो. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर अशी प्रतिज्ञा करते की, वरील अर्जामधील सर्व मजकूर व त्याखाली केलेले ॲफिडेव्हिट मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. ता. २४/०२/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri. Jayanti Manohar Patil
of Kodoli who is Age : 27
identified by Shri G.G. Naniwadekar
Adv. whom I know personally
Dated :- 24.2.2026.

24.2.26.

Assistant Superintendent

R/S

प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज पूर्णपणे चुकीचा असून
[illegible] खोटी आहे.

उलटतपासणीचे काम चालू असताना
प्रतिवादी यांनी अशा प्रकारची मागणी [illegible] यापूर्वी
अर्ज दाखल केलेला नव्हता व नाही.
आदेश
NOCESS मा. 17/6/2024 रोजी आदेश झालेला असून
वादीने ता. 5/11/25 रोजी पुरावा संपविला आहे.
व. केस नेम. ता. 5/11/2025 पासून प्रतिवादीचे
पुरावे कामी नेमलेली आहे. यामुळे प्रतिवादी अशा
प्रकारचा अर्ज देण्याचा हक्क व अधिकार राहिला नाही
अर्ज नामंजूर करणेत यावा. अर्ज मंजूर
करणेत आल्यास रु. 5000/- दंड करणेत
यावा ही विनंती

पनवेल

ता. 20/4/26

Adv. V.A. Patil.